Maharashtra Political Science and Public Administration Conference

Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 10 No - 1 Issue - 28 Jan-April 2022 ISSN- 2347-9639

39Years

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

IIJIF
Impact Factor
2.283



## भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका

# विचार मंथन

प्र. लदाटे आर. बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे

Dr. Mohan N. Kha...
Principal
A. V. Education Society's
Degloor College, Degloor Dist. Nanded

अथर्व

संपादक
प्राचार्य डॉ. प्रमोद पवार

प्राचार्य डॉ. मनोहर पाटील । प्राचार्य डॉ. बाळ कांबळे । डॉ. रविंद्र भणगे । डॉ. विठ्ठल दहिफळे

Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद

Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985

# VICHAR MANTHAN

# विचारमंथन

**National Research Journal of Political Science and Public Administration**
**(A Peer Reviewed Journal)**
Vol. - 10, No - 1 Issue - 28 Jan.-April 2022 ISSN- 2347-9639

♦ **Editor** ♦

**Prin. Dr. Pramod Pawar**

**Prin. Dr. Manohar Patil** **Prin. Dr. Bal Kamble**

**Prof. Dr. Ravindra Bhanage** **Dr. Vitthal Dahiphale**

**Dr. Sandip Nerkar**

♦ **President** ♦

**Prin. Dr. Pramod Pawar**
**Email :** pramodpawar1761@gmail.com
Mob : **9423582073**

♦ **Secretary** ♦

**Prin. Dr. Manohar Patil**
**Email :** manoharpatil123@gmail.com
Mob : **9422287053**

♦ **Guided by** ♦

**Prin. Dr. P. D. Deore**
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc.,
Savarkar Nagar, Gangapur Road, **Nashik-13**
Mob : **9423980457**

**Maharashtra Political Science and Public Administration Conference**
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
**Visit Us : vicharmanthanjournal.org**
**E-mail : vicharmanthanjournal@gmail.com**

# * अनुक्रमणिका *


- **नायकप्रधान लोकानुरंजनवादी राजकारण आणि भारतीय लोकतंत्र** ........ ०१
  प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे
- **महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते प्रवाह : आघाड्यांचे राजकारण** ........ १५
  प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे
- **महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकारण** ........ २०
  डॉ. श्याम पुंजाराम पवार
- **विदर्भाची मागासलेपण सद्यःस्थिती** ........ २३
  धनराज लक्ष्मण शिरभैय्ये, डॉ. जीवन एच. पवार
- **लोकशाही : एक जीवनपद्धत संकल्पना** ........ २७
  डॉ. संभाजी संतोष पाटील
- **प्रादेशिक असमतोलाचे राजकारण व मानव विकास** ........ ३५
  डॉ. हनुमंत भूमकर, रावसाहेब रतन चव्हाण
- **महाराष्ट्र राज्याची सहा दशकांची वाटचाल आघाडीचे राजकारण** (Coalition Politics) ........ ३९
  प्रा. प्रमोद निवृत्ती कपले
- **महाराष्ट्रातील आघाडीचे राजकारण** ........ ४५
  प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे
- **भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीची चिकित्सा** ........ ४९
  डॉ. व्ही. एल. एंडे
- **भारतीय लोकशाहीतील वृत्तपत्रांची भूमिका** ........ ६५
  प्रा. डॉ. एल. यू. मेश्राम, प्रा. श्रीमती स्मिता भामरे
- **प्रादेशिक असमतोल** (Regional Imbalance) ........ ७०
  डॉ. सौ. ऊर्मिला महेश चव्हाण
- **विदर्भाची मागासलेपण सद्यःस्थिती** ........ ७४
  माधव चोले
- **Role of India in World Politics Today** ........ ८०
  Dr. R. G. Suralkar
- **A View on Indian Democracy** ........ ८३
  Dr. Nirmal Ekanath Sitaram
- **India's Foreign Policy & SAARC** ........ ८७
  Dr. R. K. Kale
- **Political Impact and Socio-Economical Developmental Disparities in Divisions of Maharashtra** ........ ९३
  C. A. Khillare, R. B. Khandare , R. V. Maske




Scanned with CamScanner

# विदर्भाची मागासलेपण सद्य:स्थिती

**माधव चोले**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
देगलूर महाविद्यालय, देगलूर

महाराष्ट्राच्या राज्य राजकारणातील विदर्भाच्या मागासलेपणाचा मुद्दा हा वारंवार चर्चेला येणारा असून याच मुद्यावरून वारंवार विदर्भातून स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी केली जाते. विदर्भ हा ब्रिटिश काळापासून उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मागासलेला राहिलेला आहे. ब्रिटिश काळात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे विदर्भ मागास राहिलेला आहे. विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश केल्यानंतर सत्ताधीशांनी वारंवार विदर्भ विकासाचे आश्वासन दिले; पण ते व्यवहारात आणू शकले नाहीत. उद्योगांचे, विकासाचे, रोजगाराचे, सोयी-सुविधांचे केंद्र मुंबई, ठाणे, पुणे, कोकण असेच राहिलेले आहे. विदर्भ मात्र विकासाच्या बाबतीत दूर राहिलेला आहे.

खालील मुद्यांच्या आधारे विदर्भाच्या विकासातील मागासलेपणाचे स्वरूप निश्चित करता येईल -

**सिंचन -** दांडेकर समितीच्या मतानुसार, राज्यातील सिंचनक्षमता ४११४.२८ हजार हेक्टर होती. त्यात विदर्भाचा वाटा ७३४-६७ हजार हेक्टर (१७.२४ टक्के) होता. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ १५८०.५ हजार हेक्टरने मागे होता. ही तफावत दूर करण्यासाठी ५२.३७ टक्के म्हणजे लाख रुपयांचा निधी आवश्यक होता.[१] प्रभुसीता व पी. सी. सरकार यांच्या अभ्यासानुसार, (१९८५-८६) पश्चिम महाराष्ट्राची सिंचनक्षमता विदर्भापेक्षा ३०.१८ टक्क्यांनी जास्त असल्याचे आढळते. निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार (१९९४), राज्यातील एकूण सिंचन अनुशेष ७४१८ कोटी रुपये होता. त्यात विदर्भ विभागाचा वाटा ४,०८३ कोटी रुपये (५५.४ टक्के) होता. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भातील सिंचन अनुशेष ३,५३३ कोटी रुपयांनी (४७.६३ टक्के) जास्त आहे. जून २०१० मध्ये विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष ११,५८,०१० हेक्टर एवढा आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत हा अनुशेष वाढलेला दिसतो. सिंचनात २०१० मध्ये विभागवार झालेली वाढ कोकण - ४,३३,९२० हेक्टर (४९.४० टक्के) पुणे - ३६,४०,०१० हेक्टर (९९.३७ टक्के), नाशिक - २१,१९,३०० हेक्टर (५७.९४ टक्के), मराठवाडा - २२,७५,१७० हेक्टर (४७.८४ टक्के) अमरावती - ८,५२,७९० हेक्टर (२७.१८ टक्के), नागपूर - ११,६५,०८० हेक्टर (५९.१७ टक्के) अशी आणि एकूण विदर्भात २०,१७,८७० हेक्टर (३९.५१ टक्के). या माहितीवरून विदर्भात सिंचनात झालेली वाढ पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत फारच कमी आहे. विदर्भात विहिरींद्वारे होणारे जलसिंचनही इत्तर विभागांच्या तुलनेत फारच कमी आहे. अपवाद फक्त कोकण विभागाचा आहे. ३१ मार्च २०११ रोजी कृषिपंपाचा अनुशेष राज्यात ४,८५,६८३ आहे. त्यात विदर्भाचा कृषिपंपाचा अनुशेष ३,५९,८५६ एवढा आहे. यावरून लक्षात येते, उर्वरित प्रांताच्या तुलनेत विदर्भाची अत्यंत वाईट अवस्था आहे.

विदर्भाची जलसिंचनाच्या बाबतीत इतर प्रदेशांच्या तुलनेत अत्यंत वाईट आणि गंभीर अवस्था आहे. शासनाने त्याबाबतीत प्रयत्न केलेले आहेत; पण कृष्णा खोऱ्याला भरपूर निधी देऊनही वारंवार निधी मागण्यात येत आहे. विदर्भातील सिंचन प्रकल्पांना राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे मिळणारा निधी सातत्याने राज्यपालांचे निर्देश डावलून कृष्णा खोऱ्याकडे वळविला जात आहे. याबाबतीत राज्यपालांनी वारंवार निर्देश दिलेले आहेत की, निधी इतरत्र वळवू नये, तसेच उच्च न्यायालयानेही शासनाला फटकारलेले आहे. विदर्भातील जलसिंचनातील ३० टक्के पाणी औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांना लागते. त्यामुळेही शेतीच्या पाणीवापरावर मर्यादा येत असतात आणि ही वीज विदर्भापेक्षा पश्चिम महाराष्ट्राला दिली जाते.

विदर्भात वापर जास्त असल्याने वा कायद्याने अनेक प्रकल्पांना वाजवी दरात उपलब्ध करून न दिल्याने अथवा त्यास ५ ते ३० वर्षांचा कालावधी लागत असल्याने अनेक प्रकल्प रखडले आहेत. उदाहरणार्थ - १९८३ पासून हुमन प्रकल्प रखडला आहे. सद्य:स्थितीत विदर्भात १४७ सिंचन



Scanned with CamScanner

प्रकल्प वा जमिनीमुळे अडलेले आहेत. या प्रकल्पांची सिंचनक्षमता १२१७.५९९ हेक्टर आहे. राज्यात प्राथमिक अवस्थेत असलेले मोठे व मध्यम १८ प्रकल्प आहेत. त्यापैकी विदर्भातील सात प्रकल्प आहेत. त्याचे कारण वनजमीन उपलब्ध न झाल्यामुळे आहेत. २५ टक्क्यांहून कमी खर्च झालेल्या प्रकल्पांची संख्या राज्यात ४८ आहे. त्यापैकी एकट्या विदर्भात २५ आहे. त्यामुळे सिंचनक्षमता कमी आहे. शिवाय, विदर्भ पाटबंधारे विभागाला उपलब्ध कर्मचाऱ्यांचा तुटवडा आहे. त्यामुळे वेळेवर कामे होत नाहीत. पाटबंधारे विकास महामंडळात ८४ उपअभियंते, ३७१ शाखा अभियंत्यांची पदे रिक्त आहेत.

एकंदरीत विदर्भ सिंचनातील अडचणी वनजमिनी कायद्याचा, निधी पळविणे आणि पूर्ण निधी दिला जात नाही. शिवाय, त्यातील भ्रष्टाचार हेही कारण पुढे आलेले आहे.

**विद्युतीकरण –** दांडेकर समितीच्या अभ्यासानुसार, ३१ मार्च १९८३ पर्यंत महाराष्ट्रात ४,९६८ खेड्यांचे विद्युतीकरण झालेले नव्हते. त्यात एकट्या विदर्भातील २,८७९ खेडी (५२.०५ टक्के) विद्युतीकरणापासून दूर होती. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भातील १,९४८ खेड्यांचे विद्युतीकरण झालेले नव्हते. याच समितीच्या मतानुसार, १९८४ मध्ये महाराष्ट्रात १,४२,८८५ विद्युत पंप संचांचे ऊर्जीकरण झालेले नव्हते. त्यात विदर्भाचे ५७,९८१ (४०.५७ टक्के) विद्युत पंपांचाच समावेश होता. या विद्युत पंप संचांच्या भौतिक अनुशेषाचे मूल्य ७५३७.५३ लाख रुपये होते.[२] निर्देशांक व अनुशेष समितीच्या अभ्यासानुसार, १९९४ मध्ये महाराष्ट्राचा पंप विद्युतीकरणाच्या मूल्यातील अनुशेष १,२२,२७२ कोटी रुपये होता. त्यात विदर्भाचा अनुशेष ७०३.०४ कोटी रुपये (५७.४९ टक्के) होता. त्याचवेळी पश्चिम महाराष्ट्राचा अनुशेष शून्य झाला होता.[३] १९८३ च्या तुलनेत २००८-०९ मध्ये विदर्भातील सर्वच जिल्हे राज्य सरासरीपेक्षा वर आहेत आणि सर्वच गावांत वीज पोहोचलेली आहे. विदर्भातील सर्व गावांत वीज पोहोचली असली, तरी कृषिपंपासाठी विजेच्या वापरात उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भ फारच मागे आहे. एकट्या पुणे जिल्ह्यात कृषीसाठी जेवढी वीज वापरली जाते, तेवढी विदर्भाच्या ११ जिल्ह्यांत वापरली जात नाही. विदर्भात वीज उत्पादन विपुल असूनही खेड्यापाड्यांत पोहोचूनही शेतीसाठी शेतकरी पंप संच बसवत नाहीत. कारण विदर्भात जलसिंचन विपुल नाही. त्यामुळे विजेचा वापर पश्चिम महाराष्ट्रात उद्योगांसाठी, शेतीसाठी केला जातो, तर विदर्भात विजेबाबत अनिश्चितता, भारनियमनाला तोंड द्यावे लागते. याला राज्य सरकारची शेतीविषयक धोरणे कारणीभूत आहेत.

सध्या ४३ औष्णिक विद्युत प्रकल्पांसाठी विदर्भाची जमीन, पाणी, जंगल आणि कोळसा अशा चार प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती वापरली जाईल. विद्युत केंद्रातील कोळशाच्या ज्वलनाद्वारे ५ लाख ४७ हजार टन राख बाहेर पडणार आहे, तर ४२ दिवसांना १७ लाख ५२ हजार टनांइतका कॉर्बन ऑक्साइड आणि कॉर्बन मोनो ऑक्साइड यांसारखा घातक वायू बाहेर सोडला जाईल. त्यामुळे पर्यावरण दूषित होणार आहे, तसेच राखेमुळे शेती नापीक होईल. वीज वाहून नेण्यासाठी मनोरे उभारावे लागतील. त्यासाठी सुमारे ५२ ते ६० हजार हेक्टर इतक्या भूक्षेत्राची गरज भासणार आहे. याचा फायदा मात्र पश्चिम महाराष्ट्राला होणार आहे.[४] १ एप्रिल २००९ रोजी विदर्भात कृषिपंपाचा अनुशेष २,४२,७११ पंपांचा आहे. हा अनुशेष दूर करण्यासाठी आजच्या किमतीप्रमाणे अंदाजे २६,००० कोटी खर्च करावे लागतील. उलट पश्चिम महाराष्ट्रात ३,९४,४५१ कृषिपंपाचे अधिकचे विद्युतीकरण होऊन ४,२२० कोटी रुपये अधिक खर्च झालेले आहेत.[५]

**शासकीय सेवा –** विदर्भाला महाराष्ट्रात सामील करताना लोकसंख्येच्या प्रमाणात, शासकीय सेवेत संधी देण्याचे आश्वासन देण्यात आलेले होते. हे आश्वासन पाळले गेले नाही. त्यामुळे शासकीय सेवेत विदर्भवासियांची नगण्य संख्या आहे. इतर रोजगारांतही विदर्भवासियांचे प्रमाण फारच कमी आहे; पण ज्याप्रमाणे कोस्टल आंध्रावाल्यांनी तेलंगणा लोकांना नोकऱ्या देण्यात भेदभाव केला, तसा महाराष्ट्रात विदर्भवासियांना नोकऱ्या देण्यात भेदभाव झालेला नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. आजही विदर्भातील सुशिक्षितांना पश्चिम महाराष्ट्रात नोकऱ्यांची संधी भेदभाव न करता दिली जाते, ही सकारात्मक बाजू आहे.

**शिक्षण क्षेत्र –** विदर्भ विकास महासभेच्या अभ्यासानुसार (१९८०), शाळा नसलेल्या खेड्यांची संख्या महाराष्ट्रात २,०४८ होती. त्यांपैकी १,६१४ खेडी विदर्भातील होती. त्यावेळी फक्त एक नागपूर विद्यापीठ आणि दोन अभियांत्रिकी महाविद्यालये होती.



Scanned with CamScanner

नागपूर विद्यापीठात दर विद्यार्थ्यामागे ८८० रुपये, तर महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांत ६००० रुपये इतका खर्च केला गेला. त्यावेळी महाराष्ट्रात तांत्रिक शाळा २०७ होत्या. त्यांपैकी विदर्भात फक्त २६ होत्या. पश्चिम महाराष्ट्रात १३२ तांत्रिक शाळा जास्त होत्या.[६] दांडेकर समितीच्या अभ्यास अहवालानुसार, विद्यार्थी नावनोंदणीतील अनुशेष ६,५५,१०९ होता. त्यांपैकी विदर्भाचा १,०९,८८८ (१६.७७ टक्के) जास्त होता. शाळा व महाविद्यालयांचा अनुशेष ४,५९६ होता. त्यात विदर्भाचा वाटा ९२६ (२०.१४ टक्के), तर पश्चिम महाराष्ट्राचा वाटा २,६३९ होता. हा अनुशेष जास्त असल्याचे कारण खाजगी शाळा व महाविद्यालयाचा संदर्भ घेतला नव्हता. महाराष्ट्रात शिक्षणाविषयीचा अनुशेष २२,०६६ होता. त्यांपैकी विदर्भात ६,९५९ (३५.५८ टक्के) होता. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाचा शिक्षकाचा अनुशेष हा ५१.३२ टक्क्यांनी जास्त होता. प्रभुसीता व पी. सी सरकारने साक्षरतेच्या संदर्भात अनुशेष दाखविला. विदर्भात २६.९१ टक्के जनता साक्षर होती, तर पश्चिम महाराष्ट्रात ४४.१४ टक्के जनता साक्षर होती. निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार (१९९४), सामान्य शिक्षणातील अनुशेषाचे मूल्य ३९.५८ कोटी रुपये होते; त्याचप्रमाणे तांत्रिक शिक्षणातील रुपये मूल्य ११२.४९ कोटी रुपये होते.

१९८२–८३ च्या तुलोत २००८–०९ मध्ये विदर्भात प्राथमिक शाळेच्या संख्येत (दर एक लाख लोकसंख्येमागे) घटच झाल्याचे दिसते. राज्यस्तरावरही घटच झाल्याचे दिसते; त्याचप्रमाणे विद्यार्थी नावनोंदणीतही घटच दिसते; पण दर एक लाख लोकसंख्येमागे शिक्षकांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसते.

१९८२–८३ च्या तुलनेत २००८–०९ मध्ये विदर्भात माध्यमिक शाळांची संख्या (दर एक लाख लोकसंख्येमागे) वाढल्याचे दिसते. विद्यार्थी नावनोंदणीतही वाढ झालेली दिसते; पण राज्यस्तरावरची सरासरी ओलांडणारा एकही जिल्हा विदर्भात नव्हता. शिक्षकांची संख्याही वाढल्याचे दिसते. राज्यस्तरावरही शिक्षकांची संख्या वाढल्याचे दिसते.

१९८२–८३ च्या तुलनेत २००८–०९ मध्ये विदर्भात दर एक लाख लोकसंख्येमागे विद्यार्थी प्रवेशसंख्या वाढलेली दिसते, तसेच शिक्षकांची संख्या, शाळांची संख्याही वाढलेली दिसते. एंकदरीत शासकीय शैक्षणिक सेवा–सुविधा विदर्भाला पुरेशा दिलेल्या होत्या; पण पश्चिम महाराष्ट्रात खाजगी शिक्षण संस्थांचे जाळे, विशेषत: पुणे परिसरात वाढलेले दिसते.

**कृषी क्षेत्र –** दांडेकर समिती अभ्यास अहवालानुसार, भूविकास मागासलेपणाचे एकूण मूल्य ८३१९–१४ लाख रुपये होते. त्यात विदर्भाचा वाटा ११६८.१२ लाख रुपये, तर पश्चिम महाराष्ट्रात ४४९३.९९ लाख रुपये होते. पश्चिम महाराष्ट्रात जास्त असण्याचे कारण पिकाखालील जमीन जास्त होती. बांधबंदिस्तीचे एकूण ८९०३.५० लाख रुपये अनुशेष होता. त्यात विदर्भ ४७९०.५०, तर पश्चिम महाराष्ट्राचे मागासलेपण ३,७९९ लाख रुपयांनी विदर्भापेक्षा कमी आहे. राज्यात फलोद्यान विकास अनुशेष २८४.११ लाख रुपये. त्यात विदर्भ १.१७, तर पश्चिम महाराष्ट्राचा २१९.३७ लाख रुपये होता. जास्त असण्याचे कारण फलोद्यान शेती विस्तृत होती. प्रभुसीता व पी. सी. सरकार यांनी १९८५–८६ मध्ये खत उपयोगिता, ट्रॅक्टर वापर आणि कृषी क्षेत्रातील बँक पत विदर्भात अनुक्रमे १४.४८, २५.१ व २२.९३ टक्के होते. तेच प्रमाण पश्चिम महाराष्ट्रात ७३.९६, ५४.७८ व ५५.४६ टक्के होते. अर्थात, मोठी तफावत होती. निर्देशांक व अनुशेष समितीने (१९९४) शेती विकासातील अनुशेष एकूण राज्यात ७८८.५५ कोटी होता. त्यात विदर्भाचा ३०७.६५, तर पश्चिम महाराष्ट्राचा ८९.३० कोटी रुपयांनी कमी होता.

राज्यात २००८ मध्ये पिकांखालील सिंचनक्षमता कोकण – ४४.८३, पुणे – ९६.३७, नाशिक – ५१.५२, मराठवाडा – ४४.४९, तर विदर्भात ३७.११ एवढी होती. अर्थात, सर्वाधिक सिंचनक्षमता पश्चिम महाराष्ट्रात आणि सर्वांत कमी विदर्भात होती. १ एप्रिल २००९ रोजी विदर्भात कृषिपंपाचा अनुशेष २,४२,७११ एवढा आहे. आजच्या किमतीप्रमाणे २,६०० कोटी रुपये खर्च करावे लागतील. उलट पश्चिम महाराष्ट्रात त्याचवेळी (२००९) ३,९४,४५१ कृषिपंपांचे अधिकचे विद्युतीकरण झालेले आहे व त्यावर ४,२२० कोटी अधिक खर्च झालेला आहे. २००७–०८ मध्ये राज्यात विहिरींची संख्या ३,२१,६०० आहे. त्यात विदर्भात फक्त ३१,४०६, तर पश्चिम महाराष्ट्रात २,५२,४८६ इतकी आहे. राज्यात उसाखालील पीक क्षेत्र ४९४, ३६० हेक्टर आहे. पुणे विभागात ३,२२,४६० हेक्टर, तर विदर्भात ११ जिल्ह्यांत फक्त ७,००० हेक्टर आहे. शेतीसाठीही विदर्भात वीजवापर फारच कमी आहे.[७]



Scanned with CamScanner

**आरोग्य सेवा** – दांडेकर समितीच्या अभ्यास अहवालानुसार, राज्यात ३५४ आरोग्य केंद्रांचा अनुशेष होता. त्यापैकी ५० केंद्रांचा (१४.१२) अनुशेष विदर्भात, तर पश्चिम महाराष्ट्रात ७३ केंद्रांनी जास्त होती. राज्यात खाटांचा अनुशेष ७,५६० होता. त्यात विदर्भात १,४७३, तर पश्चिम महाराष्ट्रात ३,२२६ खाटांचा होता. आरोग्यसेवांचे मूल्य अनुशेष राज्यात २२,१२१ लाख रुपये, तर विदर्भात ४९२१.६० लाख रुपये होता. पश्चिम महाराष्ट्रात अनुशेष जास्त होता. कारण, येथे खाजगी आरोग्यसेवेचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्राचा अनुशेष जास्त दाखविला आहे. प्रभुसीता व पी. सी. सरकार यांनी विदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्राचे व रुग्णालयातील खाटांचे प्रमाण ३०.३४ टक्के व २६.७३ टक्के होते. त्याचवेळी पश्चिम महाराष्ट्रातील हेच प्रमाण ४१.० टक्के व ५१.२१ टक्के होते. यावरून आरोग्यसेवेतील असंतुलन लक्षात येते. निर्देशांक व अनुशेष समितीच्या मतानुसार आरोग्यसेवेतील आुशेष १२२३ कोटी रुपये होता. त्यात विदर्भाला वाटा २१३.१६ कोटी रुपये होता.

२००८–०९ पर्यंत एक लाख लोकसंख्येमागे उपलब्ध दवाखान्यांची संख्या आकडेवारीनुसार सर्व जिल्ह्यांत घटलेली आहे. आरोग्य सुविधांबाबत अनेक जिल्हे खूपच मागास आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाबतीत फक्त नागपूर जिल्हा राज्य सरासरीपेक्षा खाली आहे. बाकीचे सर्वच जिल्हे राज्य सरासरीबरोबरीला आहेत. गडचिरोली जिल्हा तर अव्वल स्थानावर आहे. गडचिरोली जिल्ह्यात ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. दर एक लोकसंख्येमागे ११ सरकारी रुग्णालये असल्याचे दिसते. याबाबतीत एकटा गडचिरोली जिल्हा वगळता अन्य १० जिल्हे राज्य सरासरीपेक्षा खाली आहेत.[३२]

विदर्भात आरोग्य सुविधांबाबत शासनाचा प्रयत्न होत असला, तरी सुविधांबाबत स्थिती चिंताजनक झाल्याचे दिसते. विशेषत: कुपोषणाचे प्रमाण घातक ठरत आहे. आरोग्य सुविधांची व्यवस्था मोठ्या प्रमाणात नाही.

**रस्ते विकास** – १९६१ ते १९८१ पर्यंत २० वर्षांत रस्तेविकास योजनेला ठरलेले लक्ष्य निर्धारित करताना महाराष्ट्रात रस्त्यांचा अनुशेष ३१,८२८ किलोमीटरचा निर्माण झाला. त्यात विदर्भाचा अनुशेष १४,०८२ किलोमीटर (४४.२१ टक्के) होता. त्याचवेळी तीन विभागांचा एकूण अनुशेष १६,७४६ किलोमीटर (५५.७६ टक्के) होता. या अनुशेषाबाबत पश्चिम महाराष्ट्राशी तुलना केली असता, विदर्भाचा अनुशेष पश्चिम महाराष्ट्रापेक्षा ८,३३२ किलोमीटरने (२६.१८ टक्के) जास्त होता.[९] दांडेकर समितीच्या मतानुसार, १९८२ मध्ये महाराष्ट्रात १७,८१० खेडी रस्त्यांशी जोडली गेली नव्हती. त्यात विदर्भात ७,३३३ (४१.१७ टक्के) व इतर तीन विभागांत १०,४७७ (५८.८३ टक्के) होती, तसेच रस्ते मागासलेपणात एकूण अनुशेष ६०,०२० लाख रुपये होता. त्यात विदर्भाचे २९,१४३ लाख रुपये (४८.५५ टक्के) व उर्वरित तीन विभागांचे एकूण ३०,८७७ लाख रुपये (५१.४५ टक्के) आहे.[१०] प्रभुसीता व पी. सी. सरकार यांच्या अभ्यासानुसार, रस्तेविकास विदर्भातील सर्वच जिल्हे १९८५–८६ मध्ये राज्य सरासरीपेक्षा खाली होते. म्हणजेच अविकसित होते. त्याचवेळी पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच जिल्हे विकसित स्तरात होते.[११] निर्देशांक व अनुशेष समितीने महाराष्ट्राचा रस्तेविकास अनुशेष २३२७.१६ कोटी रुपये दाखविला. त्यात विदर्भाचा वाटा ९९०.७६ कोटी रुपयांनी (२८.८८ टक्के) विदर्भाचे मागासलेपण अधिक आढळते.[१२] ३१ मार्च २००८ रोजी विदर्भात राष्ट्रीय महामार्गाचे निर्धारित लक्ष्य गाठलेले होते; पण राज्य महामार्ग आणि जिल्हा महामार्ग याबाबतीत ९८ टक्के प्रगती होती. त्याचवेळी उर्वरित महाराष्ट्राची १०० टक्के प्रगती होती. अन्य जिल्हामार्गांच्या बाबतीत उद्दिष्टपूर्ती –७९ टक्के होती, तर उर्वरित महाराष्ट्राची १०० टक्क्यांच्या आत होती. गावरस्त्यांचे उद्दिष्ट मात्र ५६ टक्के पूर्ण होऊ शकले होते. ही चिंताजनक बाब होती. ३१ मार्च २००८ रोजी राज्यातील ३३४ खेड्यांना रस्ते नव्हते. त्यात सर्वांत जास्त १७३ खेडी विदर्भातील होती. जवळपास ५८ टक्के होती.

१ एप्रिल २००९ रोजीचा रस्त्यांच्या एकूण अनुशेषापैकी विदर्भातील ७५.८८ टक्के, मराठवाडा – ८.८७ टक्के, तर कोकण, नाशिक व पुणे विभाग मिळून उर्वरित महाराष्ट्र १५.२५ टक्के होता. दांडेकर समितीच्या अनुशेष मूल्याप्रमाणे १ एप्रिल २००९ रोजी विदर्भाचा रस्त्यांचा अनुशेष दूर करायला ६,५०० कोटी रुपये खर्च करावे लागतील. १३ मार्च २०११ रोजी राज्यात कोणत्याच रस्त्याने न जोडलेली खेडी २२७ होती, त्यांपैकी विदर्भात १०९ (४८.१ टक्के) होती. एकंदरीत १९८० नंतर विदर्भात काही प्रमाणात रस्त्यांचा अनुशेष दूर केल्याने प्रगती झालेली आहे; पण ओक समितीच्या अभ्यास अहवालावरून



Scanned with CamScanner

राज्य स्थापनेपासून इतर विभागांच्या तुलनेत विदर्भ मागास राहिला आहे.

**उदयोगधंदे व रोजगार** – विदर्भ विकास महासभेच्या अभ्यासाुसार १९६० ते १९७८ या १८ वर्षांच्या दरम्यान महाराष्ट्रात एकूण ३,६९० कारखाने होते. त्यात विदर्भात फक्त १५६, तर कोकण व पश्चिम महाराष्ट्रात ३,१५९ होते. अर्थात, ८२ टक्के औद्योगिक उत्पादन कोकण व पश्चिम महाराष्ट्रात केंद्रित झालेले होते. विदर्भ विकास महासभेच्या मतानुसार, उद्योगांबाबतीत विदर्भाचा २००० कोटी रुपयांचा अनुशेष निर्माण झाला आहे. १९८०-८१ मध्ये विदर्भात कापूस उत्पादन ४९,८७,९१६ क्विंटल असून, सूतगिरण्या ५, तर पश्चिम महाराष्ट्रात ८,९८,०३६ क्विंटल कापूस आणि सूतगिरण्या मात्र ११ होत्या. १९६० ते १९७८ या काळात जेवढे उद्योग सुरू झाले, त्यात २,६०,७०८ लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्यावेळी विदर्भात १,१२६ लोकांना (०.४३ टक्के), तर कोकण व पश्चिम महाराष्ट्रात १,४८,३५८ लोकांना रोजगार मिळाला होता.

दांडेकर समितीच्या मतानुसार, १९६२ ते १९८३ या काळात शासनाने उद्योगधंद्यांसाठी विविध सुविधा पुरविल्या. त्यात उद्योगांसाठी ९,८०५ प्लॉटस वितरित केले. त्यात १,८०६ (१८.४० टक्के) विदर्भात व व पश्चिम महाराष्ट्राला ४,९०१ प्लॉट्स (४९.९८ टक्के) वितरित केले. याच काळात महाराष्ट्रात उद्योगांसाठी ९३१६.१० लाख रुपये खर्च केले. त्यात विदर्भ ११२५.५४ (१२.६ टक्के) लाख रुपये, पश्चिम महाराष्ट्र व कोकणाला अनुक्रमे ३५१५.६८ (३७.८७ टक्के) व ३७९४.९६ (४०.३३ टक्के) लाख रुपये खर्च करण्यात आले. १९८१ मध्ये महाराष्ट्रात एकूण कामगारांची संख्या ५,८२,३४४ होती. त्यात विदर्भात केवळ ९५,३७५ (१६.२१ टक्के) व पश्चिम महाराष्ट्रात ३,०१,८५४ (५१.३० टक्के) असे प्रमाण होते.

योगानंद काळे व व्ही. एम. वैद्य यांच्या अभ्यासानुसार, १९९२ मध्ये महाराष्ट्रात १ लाख लोकांमागे कारखान्यातील कामगारांचे सरासरी प्रमाण १४५०.६५ होते. याचवेळी विदर्भात ६०६.९३ कामगार, तर उर्वरित महाराष्ट्राचे सरासरी प्रमाण १९६९.९२ होते.[१४]

३१ ऑक्टोबर २००८ रोजी विशेष आर्थिक क्षेत्र संख्या गुंतवणूक आणि रोजगार पुढीलप्रमाणे आहे –

सर्वांत कमी प्रकल्प ९ विदर्भात, तर सर्वांत जास्त कोकणात ६५ आहेत, तर पश्चिम महाराष्ट्रात ४५, मराठवाड्यात १४ आहेत. भांडवल गुंतवणूक सर्वांत कमी मराठवाड्यात ४,०४१ कोटी रुपये, विदर्भात १२,४३२ कोटी रुपये, सर्वांत जास्त गुंतवणूक कोकणात १,१०,५८१ कोटी रुपये, त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात २९,६६८ कोटी रुपये आहे. रोजगारक्षमता सर्वांत कमी मराठवाड्यात १.५६ लाख, विदर्भात ५.७६ लाख, कोकणात सर्वाधिक रोजगार ४२.०५ लाख, तर पश्चिम महाराष्ट्रात ११.३७ लाख आहे.

३१ डिसेंबर २००८ रोजी सूक्ष्म, लघु आणि मध्यम प्रकल्प विदर्भात २१,७९८, तर मोठे प्रकल्प २९० आहेत. त्यातील रोजगारक्षमता १,४६,८९६ एवढी आहे. जास्त प्रकल्प हे पुणे, कोकण आणि नाशिक विभागात आहेत. त्यांची रोजगारक्षमताही सर्वाधिक आहे, तर मराठवाड्यात सूक्ष्म, लघु आणि मध्यम १०,८१५, मोठे प्रकल्प २२५ आहेत आणि रोजगारक्षमता ४८,७९८ एवढी आहे. ही सर्वांत कमी रोजगारक्षमता आहे.

सामूहिक विकास योजनेंतर्गत (२००७) औद्योगिक विकास याबाबतीत तालुक्यांचे वर्गीकरण केले असता, सर्वांत जास्त मागास तालुके मराठवाड्यात ७०, विदर्भात १०९ येतात, तर कोकण, पुणे, नाशिकमध्ये त्याचे प्रमाण कमी आहे. उद्योगात विकसित तालुके पश्चिम महाराष्ट्रात जास्त आहेत.[१५]

सहकारी उद्योग (२००८-०९) सर्वांत जास्त सहकारी उद्योग पुणे, ३४, नाशिक-२६, कोकण-१२, आहेत. सर्वांत कमी विदर्भात ७ आहेत. मराठवाड्यात १३ आहेत. सर्वांत कमी रोजगार विदर्भात ३,५३० एवढा आहे. सर्वांत जास्त रोजगारक्षमता पश्चिम महाराष्ट्रात आहे.

एकंदरीत मोठी, लहान उद्योग, त्यांची संख्या, भांडवल गुंतवणूक आणि रोजगार याबाबतीत कोकण-(बृहन्मुंबई वगळून) नाशिक, पुणे मोठ्या फरकाने पुढे असल्याचे दिसते, तर औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर हे मोठ्या फरकाने मागे असल्याचे दिसते. अर्थात, औद्योगिक विकासाच्या बाबतीत विदर्भ हा मागास राहिलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात उद्योगासाठी विदर्भातील खनिज संपत्ती, वनसंपत्ती, वीज मोठ्या प्रमाणात वापरली जाते आणि ज्या विदर्भात मुबलक खनिज संपत्ती, वनसंपत्ती, वीज आहे, त्यांना रोजगारासाठी पुणे, नाशिक, ठाणे, मुंबईकडे जावे लागते.[१६]



Scanned with CamScanner

अशा प्रकारे शासकीय - गैरशासकीय समित्यांच्या अभ्यास अहवालावरून विदर्भ हा पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत फारच मागास असलेले स्पष्ट होते.


संदर्भ

१. op-cit, indicators and backlog committee, 2000, page 47-49.
२. पूर्वोक्त, उखळकर आ. श्रा. १९८३, पृ. १०-११.
३. Kale yoganand and v. m. vaidya,1990, separate vidarbha:the only Alter-native page, 1-3.
४. अर्थबोध पत्रिका खंड ९, अंक १२ मार्च २०११, पृष्ठ-१६, १७.
५. ॲड. मधुकर किंमतकर, १४ ऑगस्ट २०१०, भविष्यातील विकासाकरिता वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही. विदर्भाला सुखी करा, साधना, पुणे, पृष्ठ- २३.
६. हेमंत अरुणराव कडुकर, २००६ जुलै, विदर्भाचे मागासलेपण आणि विदर्भ वैधाकि विकास मंडळ : एक अभ्यास, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे (अप्रकाशित).
७. मधुकर किंमतकर, १४ ऑगस्ट २०१०, भविष्यातील विकासाकरिता, वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही. साधना, पुणे. पृष्ठ २२, २३.
८. अर्थबोध पत्रिका खंड ९, अंक १२ मार्च २०११ पृष्ठ २२, २३.
९. उखळकर आ. श्रा., १९८३, विदर्भ : आर्थिक विकास आणि अनुशेष, विदर्भ विकास महासभा प्रकाशन, नागपूर, पृ. ५-७.
१०. prabhu seeta, k and p. c. sarkar, 1992 Identification of levels of devlopment :case of maharashtra, economic and political weekly- (EPW) september page-1935-1936.
११. Report of Indicators and backlog committee, 2000 Government of maharashtra, Department of planing, bombay page. 40-41.
१२. पूर्वोक्त, उखळकर, आ. श्रा. १९८३, पृ. ८, ९.
१३. ॲड. मधुकर किंमतकर, १४ ऑगस्ट २०१०, भविष्यातील विकासाकरिता वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही. विदर्भाला सुखी करा, साधना, पुणे, पृष्ठ- २३.
१४. हेमंत अरुणराव कडुकर, २००६ जुलै, विदर्भाचे मागासलेपण आणि विदर्भ वैधानिक विकास मंडळ : एक अभ्यास, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे (अप्रकाशित).
१५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००८-०९ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ-११०.
१६. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २००८-०९ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ-१०८, १०९, ११०, १११.


♦♦♦



Scanned with CamScanner